विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधर गट
निवडणूक २०२२ साठी निवेदन

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||


कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI
NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON

P.B.No.80, UMAVINAGAR, JALGAON-425001(M.S.)

निवडणूक विभाग


## निवेदन

आपणांस विदीत आहेच की, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांची मुदत दि.३१ ऑगस्ट,२०२२ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या अनुषंगाने निवडणूक विभागाचे कामकाज प्रत्यक्षात सुरु झाले आहे.

पदवीधरांचे विद्यापीठाच्या नोंदवहीत नांव नोंदणी करण्याकरीता व नोंदणीकृत पदवीधरांच्या मतदार यादीत नांवे समाविष्ट करण्यासाठी विद्यापीठाकडून जाहीर प्रकटन, विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांचे अर्ज www.nmu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तत्पूर्वी अधिसभेच्या नोंदणीकृत पदवीधरांसाठी १० जागांच्या निवडणूकीसंदर्भात मा.कुलगुरु महोदय, मा. प्रभारी प्र- कुलगुरु, मा. प्रभारी कुलसचिव व विभागप्रमुख निवडणुक कक्ष यांचे उपस्थितीत जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील पदवीधर विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी व यासंदर्भात जे जे व्यक्ती इच्छूक असतील त्यांचेसोबत विचार विनिमय करणेसाठी **सहविचार सभा विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये वार बुधवार दि. २९.०६.२०२२ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.**

तरी, पदवीधर विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी व यासंदर्भात जे जे व्यक्ती इच्छूक असतील त्यांनी, उपरोक्त तारखेस व वेळेस सहविचार सभेसाठी विद्यापीठात स्वखर्चाने उपस्थित रहावे, ही विनंती.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१

**प्रभारी कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**कबचौ.उमवि.जळगाव**

जा.क्र.:कबचौउमवि/निवडणूक/ 02 /२०२२
दि.२५.०६.२०२२